प्रजावाणी दि. २१/०२/२०२२

बेपत्ता अल्पवयीन मुलांचा २४ तासात शोध

प्रजावाणी २१-०२-२०२२

नांदेड, दि.२० : नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तीन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या दोन्ही अल्पवयीन मुलांचा २४ तासात शोध घेऊन नांदेड ग्रामीण पोलिसांनी ही बालके त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केली आहे. यातील एका बालकाने सोबत नेलेले रोख पाच लाख रुपये व १ लाख २ हजार रुपयांचा नवीन आयफोनदेखील पालकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. या दोन्ही अल्पवयीन मुलांच्या पालकांनी भावनिक होऊन पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहेत.

जुना कौठा भागातील पियुष शंकर गोरे (वय १५) हा शहरातील एका नामांकित शाळेत नवव्या वर्गात शिकतो. दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता तो घराबाहेर गेला, पण नंतर परतला नाही, अशी माहिती त्याचे वडील शंकर दुर्गाजी गोरे (वय ४५) यांनी १८ फेब्रुवारी रोजी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात केली होती. पियुष यास कोणीतरी फूस लावून पळवले असल्याची भीती व्यक्त करताना त्यांनी याच भागातील आशिष संतोष कांबळे (वय १७, रा. जुना कौठा) हा देखील १७ फेब्रुवारीच्या दुपारपासून दिसला नसल्याचे नमूद करुन तो देखील पियुष सोबत असावा, असे सांगितले. नांदेड ग्रामीण पोलिसांनी याप्रकरणी गुरनं ९६/२०२२, भादंविचे कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला.

त्यानंतर पोलिस उपमहानिरिक्षक निसार तांबोळी, पोलिस अधिक्षक प्रमोद शेवाळे व पोलीस उपअधीक्षक डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी तपास अधिकारी व पोलिस उपनिरीक्षक आनंद बिचेवार, सहायक बालाजी लाडेकर यांचे पथक तयार केले. पीडीत अल्पवयीन

- मुंबईच्या मालाड भागातून परत आणले
- नांदेड ग्रामीण पोलिसांची कामगिरी
- दोन्ही मुले पालकांच्या सुखरुपपणे ताब्यात
- सोबतच्या पाच लाखासह आयफोन मोबाईलही परत

मुलगा घरातील रोख रक्कम सोबत घेऊन गेल्याने रेल्वे स्टेशन, बसस्थानक, लक्झरी पॉईंट अशा ठिकाणी शोध घेऊन प्रवाशांची माहिती तसेच सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यानंतर अल्पवयीन मुलाकडे असलेल्या मोबाईलचे टॉवर लोकेशन सायबर सेलकडून मिळवले. त्यावेळी मुलाच्या मोबाईल टॉवरचे लोकेशन मुंबईतील मालाड परिसर दाखवत असल्याने शोध घेण्यासाठी मुंबईला जाणे आवश्यक होते. याबाबतच्या प्रवास परवानगीची प्रक्रिया पोलिस उपअधीक्षक डॉ. भोरे यांच्याकडून पूर्ण केल्यानंतर हे पथक शुक्रवारी (दि.१८) मुंबईला रवाना झाले.

मुंबई येथील नॉर्थ सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक चंदनशिवे व अंमलदार यांच्या सहाय्याने या दोन्ही अल्पवयीन मुलांचा शोध घेतला असता दोन्ही मुले बोरीवली येथे एकत्र आढळली. यातील एकाजवळ रोख पाच लाख रुपये आणि १ लाख २ हजार रुपयांचा आयफोन कंपनीचा १३ प्रो गोल्ड मोबाईल सोबत होता. या मुलास एवढे पैसे कोठून आणले असे विचारले असता, त्याने त्याच्या घरून मुंबईत फिरण्यासाठी व शॉपिंग करण्यासाठी मित्राला सोबत घेऊन हे पैसे आणल्याचे सांगितले.

या दोन्ही अल्पवीयन मुलांना ताब्यात घेऊन रविवारी

पान २ वर

... तर जीवालाही झाला असता धोका

या अल्पवयीन मुलांनी युट्यूबवरील मुंबईतील काही बाजारपेठेमधील दृश्ये पाहिली आणि त्यांचे मन आकर्षित झाले. दोघांनी मिळून सोबत पैसे घेऊन मुंबईला जाण्याचा प्लॅन आखला. तेथे त्यांनी अपेक्षेप्रमाणे खरेदी व मौजमजा सुरू केली. परंतु, २४ तासात पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचल्यामुळे ही पिढी वाया जाण्यापासून वाचली. अन्यथा, सोबतची रक्कम व मोबाईल पाहून त्यांच्या जीवालाही धोका निर्माण झाला असता.

पालकांनी दक्ष राहणे आवश्यक

पालकांनी आपली मुले मोबाईलवर काय पाहत आहेत, याकडे कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे. कोरोनाच्या काळात मुले खेळापासून व शाळेपासून दूर गेल्यामुळे त्यांनी मोबाईलला आपलेसे केले आहे. आता शाळा सुरू झाल्यामुळे पुन्हा मैदानी खेळ तसेच टी.व्ही आणि मोबाईल वगळता इतर मनोरंजनामध्ये गुंतवणे आवश्यक आहे. अन्यथा मुलाच्या मानसिकेतवर विपरित परिणाम पडेल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.